दिनांक : .१.२०२०

प्रति,

माननीय श्री. नरेंद्र मोदी,
पंतप्रधान, भारत सरकार, नवी देहली ११० ००१

**विषय : विस्थापित काश्मिरी हिंदूंचे कायमस्वरूपी पुनर्वसन करण्यासाठी काश्मीरमध्ये सुरक्षित वातावरण निर्माण करण्याविषयी...**

महोदय,

आज कोट्यवधी हिंदूंचे गोत्र कश्यप आहे आणि काश्मीर ही कश्यप ऋषींची भूमी आहे. युगानेयुगे आम्ही आचार-विचार, आहार-विहार आदींमध्ये एक समान सांस्कृतिक वारसा जोपासत आहोत. पृथ्वीवरील विविध स्थानांवर देवतांनी आपापली स्थाने बनवली. त्याच क्रमाने ज्ञानाची देवता सरस्वतीदेवीने जे स्थान पसंत केले, ते काश्मीर होय. म्हणूनच काश्मीरचे नाव 'शारदादेश' असेही आहे. यामुळेच जगद्‌गुरु आद्यशंकराचार्य काश्मीरमध्ये पोहोचले आणि तेथे त्यांनी धर्मग्रंथांची रचना केली. याच ठिकाणी अनेक ऋषीमुनींनी शैव तत्त्वज्ञानापासून ते अनेक शास्त्रांची रचना करून ते मानवजातीला उपलब्ध करून दिले आहे.

असे काश्मीरचे खोरे भारताच्या दृष्टीने सर्वच पातळ्यांवर महत्त्वाचे आहे. काश्मीरच्या खोऱ्यातील हिंदु इतिहासकाळापासून मोगल राज्यकर्त्यांकडून सातत्याने होणाऱ्या आक्रमणांना सतत बळी पडले आहेत. इतकी प्रचंड आक्रमणे होऊनही काश्मीरमधील हिंदूंनी आपले अस्तित्व टिकवून ठेवले होते; मात्र वर्ष १९९० मध्ये स्वतंत्र भारतातच पाकिस्तान पुरस्कृत जिहादी आतंकवाद्यांकडून त्यांना लक्ष्य करून आक्रमणे करण्यात आली. यात सहस्रो हिंदूंची हत्या करण्यात आली, सहस्रो महिलांवर बलात्कार करण्यात आले. या सर्व अत्याचारांमुळे, तसेच हिंदूंची मंदिरे, घरे, जमीन, संपत्ती बळकावून त्यांना धमकावल्याने साडेचार लक्षहून अधिक हिंदूंना काश्मीर खोऱ्यातून विस्थापित व्हावे लागले. ही घटना भारताच्या लोकशाहीला काळीमा फासणारी असूनही तत्कालीन भारत सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. या घटनेला आता ३० वर्षे होत असूनही विस्थापित हिंदूंचे अद्याप पुनर्वसन झाले नसून ते न्यायापासून वंचित आहेत.

बांगलादेशात वर्ष १९७१ च्या युद्धाच्या काळात हिंदूंवर अत्याचार करणाऱ्यांना तेथील सरकारने दोषी सिद्ध करून त्यांना दंडित केले आहे; मात्र भारतातील काश्मिरी हिंदूंवर अन्याय करणाऱ्यांच्या विरोधात कोणतीही कृतीयोजना दिसत नाही. आजवरच्या निधर्मी म्हणवणाऱ्या सरकारांनी या समस्येकडे कायमच दुर्लक्ष केले होते, त्यामुळे देशातील समस्त हिंदूंना भाजप सरकारकडून यासंदर्भात ठोस कारवाईची अपेक्षा आहे.

*** या संदर्भात आम्ही काही गोष्टी आपल्या निदर्शनास आणून देत आहोत.....**

१. विस्थापित काश्मिरी हिंदु देशातील अनेक भागांत मिळेल त्या स्थितीत अत्यंत वाईट अवस्थेत राहत आहेत. या हिंदूंकडे कोणत्याही सरकारने आतापर्यंत लक्ष दिले नाही अथवा त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडवला नाही. ते रहात असलेल्या छावण्यांची दुरवस्था असून अनेक ठिकाणी त्यांना दोन वेळचे अन्नही मिळणे दुरापास्त आहे.

२. गेली २९ वर्षे हे हिंदू या स्थितीत रहात असल्याने काश्मिरी हिंदूंच्या कौटुंबिक समस्या निर्माण झाल्याने त्यांची जनसंख्याही घटली आहे.

३. येथील युवक आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही प्रकारचे व्यावसायिक, तसेच अन्य शिक्षण घेऊ शकले नाहीत. त्यामुळे या तरुणांना अक्षरश: मोलमजुरी करून जीवन कंठावे लागत आहे.

*** त्यामुळे या संदर्भात आमच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत......**

१. काश्मिरी हिंदूंवर झालेले अत्याचार हे 'वंशसंहार' या वर्गात मोडण्यात यावेत.

२. काश्मिरी हिंदूंवरील अनन्वित अत्याचार करणारे आणि त्यांचा पायबंद करण्यास अपयशी ठरलेले तत्कालीन राज्यकर्ते यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत, तसेच त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी न्यायिक लवाद नेमण्यात यावा.

३. अन्य धर्मीय विस्थापितांना भारतात स्थायिक होण्यास सुरक्षितता प्रदान केली जाते; त्याचप्रमाणे आपल्याच देशात विस्थापित झालेल्या काश्मिरी हिंदूंना स्वभूमीत स्थायिक होण्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करावे.

४. काश्मिरी हिंदूंची पुनर्वसन योजना ही कालबद्ध समयमर्यादा ठेवून राबवण्यात यावी, यासाठी विशेष विभागाची स्थापना करून त्या विभागाला या संदर्भातील सर्व निर्णय घेण्याचे अधिकार द्यावेत.

५. गेली अनेक वर्षे हे हिंदु परागंदा स्थितीत राहत असल्याने येथील हिंदु युवकांना कायमस्वरूपी रोजगार किंवा शासकीय नोकरी उपलब्ध करून द्यावी.

आपला नम्र,